# जागतिक ल्यूपस दिवस

## ल्यूपस म्हणजे काय?

ल्यूपस ही एक दीर्घकालीन ऑटोइम्यून आजार आहे ज्यामध्ये शरीराची रोगप्रतिकारक शक्ती स्वतःच्या निरोगी ऊतींवर हल्ला करते. यामुळे त्वचा, सांधे, मूत्रपिंड, मेंदू आणि इतर अवयव प्रभावित होतात.

## सामान्य लक्षणे

💤 सतत थकवा
🦴 सांधेदुखी आणि सूज
🌸 गालांवर फुलपाखराच्या आकाराचा चट्टा
🌡️ ताप
👶 केस गळणे
☀️ सूर्यप्रकाशाची sensitivity

## 💊 उपचार

**दीर्घकाळ थकवा, ताप, त्वचेवर रॅशेस, आणि एकाधिक अवयव प्रभावित असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्या (ANA व ANTI-DSDNA चाचणी).**

- *NSAIDs (उदा. नेप्रोक्सेन 250-500 मिग्रॅ दिवसातून २ वेळा)*
- *हायड्रॉक्सीक्लोरोक्वीन (200-400 मिग्रॅ/दिवस)*
- *कॉर्टिकोस्टेरॉइड्स (उदा. प्रेडनिसोलोन 5-60 मिग्रॅ/दिवस)*
- *इम्यूनोसप्रेसंट्स:*
- *अझाथायोप्रिन 1-3 मिग्रॅ/किलो/दिवस*
- *मायकोफेनोलेट मोफेटिल 1-3 ग्रॅम/दिवस*
- *मेथोट्रेक्सेट 7.5-25 मिग्रॅ/आठवड्यातून एकदा*
- *बायोलॉजिकल औषधे: बेलिमुमॅब, रिटुक्सीमॅब*

## 🔍 फार्मासिस्टने काय निरीक्षण करावे आणि काय सूचना द्यावे

- **वारंवार वेदनाशामक घेणारे रुग्ण** → वेदना किती काळापासून आहेत, सकाळी जास्त stiffness आहे का विचारून, ६ आठवड्यांपेक्षा अधिक झाल्यास डॉक्टरांकडे रेफर करा.
- **थकवा आणि वारंवार ताप येण्याची तक्रार** → ऑटोइम्यून आजाराचा संशय; डॉक्टरकडे पाठवा.
- **गालांवर फुलपाखराच्या आकाराचा लालसर चट्टा** → सूर्यप्रकाशापासून बचावाबद्दल माहिती द्या आणि त्वचारोग तज्ञाकडे पाठवा.
- **अस्वाभाविक केस गळती** → इतर लक्षणे विचारावीत (थकवा, सांधेदुखी).
- **सूर्यप्रकाशामुळे त्वचेवर रॅश येतो** → सनस्क्रीन, टोपी वापरण्याचा सल्ला द्या आणि तज्ञ डॉक्टरांकडे पाठवा.
- **बऱ्याच औषधांचा उपयोग करूनही परिणाम नाही** → ANA चाचणी किंवा रुमॅटोलॉजिस्टची भेट सुचवा.

Ref:Lupus Foundation of America

The information provided by MSPC's Drug Information Centre is for consultation purposes only. It is not a substitute for personalized medical or legal advice. Any treatments or procedures mentioned are informational resources for healthcare professionals and should be considered in light of specific circumstances and medical guidelines. Use this information is at your discretion. While every effort is made to ensure accuracy, Maharashtra State Pharmacy Counci's Drug information Centre is not responsible for any recommendations or errors. The center is not liable for any damages resulting from the use of this information. In case of any discrepancy across newsl